कायमविना अनुदानित तत्वावर **दुसरी मान्यता.**
(मराठी, **इंग्रजी,** हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/७१९ /२०१६**
**पुणे-१ दिनांक २२/०७/२०१६**

प्रति,

**मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका**
**सिल्व्हर स्प्रिंग फौंडेशन**
**विद्याश्रम स्कूल, वारजे पुणे.**

**विषय** :-कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/ **नैसर्गिक वाढीचा**/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र.व्हीएलएस-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३.

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक वाढीचा** /जादा तुकडया/वर्ग **सन २०१५-१६** या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **सिल्व्हर स्प्रिंग फौंडेशन विद्याश्रम स्कूल, वारजे पुणे.** | इंग्रजी | इयत्ता २ री ते इयत्ता ७ वी | नैसर्गिक वाढ | कायमविना अनुदानित तत्वावर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास /तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शासन निर्णय १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. पीटीआर ११३/(०१/२०१३)/एसएम-४, दिनांक १३/१२/२०१३ २) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ /टीएनटी.-२ दिनांक २८/८/२०१५ ३) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५/ टीएनटी.-२, दिनांक ०८/०१/२०१६ अन्वये नमूद केलेनुसार प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निर्धारित करावयाची असल्याने यापुढे नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त वाढीव तुकडी वाढ आदेशाची आवश्यकता नाही.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**सचिव / अध्यक्ष, सिल्व्हर स्प्रिंग फौंडेशन बावधन पुणे.**